
ACE TEST LAB

# ACE TEST LABS

(ISO 17025 Accredited Lab)



Battery




***END OF TEST REPORT***

ACE TEST LABS ATL

PLOT NO. 68, HSIIDC, INDUSTRIAL ESTATE, RAI , SONIPAT, HARYANA-131029
Email:info@acetestgroup.com, Mobile: 8816921177
Ph... +91-130-2060177, Fax: +91-130-2366768

| अ.क्र. | आवश्यक माहिती | पुर्तता |
| --- | --- | --- |
| | What are the ground level major precaution steps and project government taking to protect Road Accident. Information to get proper connect with Govt. of Maharashtra which location I need to connect. | अर्जदार श्री. अभय नारनवरे यांनी रस्ते अपघात रोखण्याकरिता कोणती खबरदारीची पावले उचलली आहेत तसेच त्याअनुषंगाने घेतलेले प्रकल्प कोणते याबाबत माहिती मागितली असुन, सदरची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. याकार्यालयाकडुन वाहतुक नियमन व अंमलबजावणी तसेच अपघात कमी करण्याच्या अनुषंगाने पत्रव्यवहार करण्यात येत असुन त्याबाबतची माहिती यासोबत जोडली आहे. |

## राज्यातील महामार्गावरील व द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी व अपघात कमी करण्यासाठी महामार्ग पोलीस विभागाकडून व वाहतूक पोलीस विभागाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजना

| | | |
|---|---|---|
| १ | रस्ता सुरक्षा अभियान | अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता तसेच अपघातग्रस्तांना वैदयकिय सेवा उपलब्ध करुन देणे हे उदद्देश समोर ठेऊन जनजागृतीकरीता जानेवारी महिन्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येते.<br>रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत महामार्ग पोलीस विभागातर्फे वाहन चालकांचे आरोग्य शिबीर/नेत्रतपासणी शिबीर आयोजित करते, तसेच वाहनांना रिफ्लेक्टर लावणे, वाहन चालक—पादचारी यांचे प्रबोधन करणे, सेमिनार आयोजित करणे असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येताता, तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना वाहतूक नियमनाबाबत माहिती देवून त्यांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात. याव्यतिरीक्त अशाप्रकारे महामार्ग पोलीस विभागामार्फत जनजागृती कार्यक्रम वर्षभर वारंवार घेण्यात येतात. |
| २ | ब्लॅक स्पॉट | Ministry of Road Transport and Highways (MORTH), भारत सरकार, नवी दिल्ली यांनी जाहीर केलेल्या ब्लॅक स्पॉटची व्याख्येनुसार सन २०२१ ते २०२३ या कालावधीतील आलेले ७७९ ब्लॅक स्पॉटची माहिती संकलित करुन, MORTH, सचिव रस्ते, परिवहन विभाग व महामार्गाची देखभाल करणारे (PWD/NHAI/ MSRD/Local Body) संबंधीत विभागातील अधिकारी यांना पाठवून सदर ठिकाणी रस्ते अपघातोच विश्लेषण करुन अपघातांची कारणे शोधून सदर ठिकाणी करावयाच्या तातडीच्या,अल्प व दिर्घ मुदतीच्या उपाययोजना करण्याबाबत संबंधीत विभागाकडून पाठपुरावा करण्यात येतो. |
| ३ | iRAD | केंद्र शासनाच्या Ministry of Road Transport and Highways (MORTH) यांचे कडून रस्ते अपघाताचे त्वरित विश्लेषण करता यावे या करीता जागतिक बँकेच्या सहाकार्याने INTEGRATED ROAD ACCIDENT DATABASE (iRAD) तसेच Electronic Detailed Accident Report (e-DAR) प्रकल्प संपूर्ण भारतात राबण्यिात येत आहे. |
| ४ | हायवे मुत्यूंजय दूत | अपघात झाल्यांनतर जखमी व्यक्तिस व्यवस्थित न उचलल्यामुळे किंवा अज्ञानाने हाताळल्यामुळे जखमी व्यक्तिच्या शरीरास अधिक इजा होते व प्राणहानीचे प्रमाण वाढते. बरेच लोक पोलीसांचा किंवा न्यायालयाचा ससेमिरा टाळण्यासाठी अपघातग्रस्तास मदत करीत नाही. तसेच रुग्णालयात किंवा दवाखान्यात अपघातग्रस्त किंवा जखमी व्यक्ति अनोळखी असल्यास उपचारास वेळ लागतो किंवा विलंब होतो. म्हणुन गोल्डन अव्हरमध्ये अपघातग्रस्तांना व्यवस्थितरित्या रुग्णालयात नेता यावे व त्वरीत योग्य उपचार मिळण्यासाठी दिनांक ०१ मार्च २०२१ पासून महाराष्ट्रातील हायवेवर **"हायवे मृत्यंजय दूत"** ही योजना सुरु करण्यात आली आहे.<br>सदर योजनेत हायवे मृत्यंजय दूत म्हणून महामार्गावरील पेट्रोल पंप, मॉल, लोकल ढाबे, हॉटेल्स यामधील काम करणारे कर्मचारी यांचा त्या त्या महामार्गवर चार ते पाच जणांचा ग्रुप तयार करण्यात आला आहे. अद्यापपावेतो महामार्ग पोलीस विभागात संपुर्ण महाराष्ट्रात एकुण ४००० पेक्षा जास्त हायवे मृत्यंजय दूत नोंद झालेली आहे. या प्रत्येक ग्रुपमधील कार्यरत मृत्युंजय दूत यांना खाजगी, सरकारी, निमसरकारी तसेच स्वयंसेवी संस्थेच्या मार्फतीने प्रथमोचार प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षणामध्ये अपघातग्रस्त व्यक्तिस कसे हाताळावे किंवा कसे उचलावे याचे प्राधान्याने प्रशिक्षण देण्यात येते. या प्रत्येक ग्रुपला स्थानिक प्रायोजकाकडून स्ट्रेचर व फस्टऐड किट देण्यात आले आहे.<br>हायवे मृत्यंजय दूतच्या प्रत्येक ग्रुपला महत्वाचे राष्ट्रीय व राज्य महामार्गा जवळच्या हॉस्पिटलची नावे, पत्ते व संपर्क कमांक याची माहीती पुरविण्यात आलेली आहे. तसेच १०८ हा दुरध्वनी कमांक ॲम्बुलन्ससाठी असुन खाजगी, शासकिय व इतर रुग्णालयास सलग्न असणारी ॲम्बुलंन्सची माहीती पुरविण्यात आलेली आहे. जेणेकरुन अपघातग्रस्त व्यक्तिंना ॲम्बुलन्सद्वारे गोल्डन |

| | | |
|---|---|---|
| | | अव्हरमध्ये रुग्णालयात त्वरीत कसे पोहचवता येईल याची उपाययोजना करण्यात आलेली आहे.<br>हायवे मृत्युंजय दुत यांना महामार्ग सुरक्षा पथकाकडून ओळखपत्र देण्यात आलेले आहे. तसेच उत्कुष्ट काम करणाऱ्या मृत्यंजय दूतास प्रशस्तीपत्र देवून गौरव करुन प्रोत्साहीत करण्यात येते.<br>दि रेसीलेन्ट फाऊंडेशन यांनी १९ जिल्हयांमध्ये ३६ प्रथमोपचार प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करुन राज्य महामार्ग पोलीस विभागाच्या १३५८ हायवे मृत्युंजय दूत आणि स्टाफ यांना प्रथमोपचार प्रशिक्षण, अग्निशमन, अपात्कालीन बचाव प्रशिक्षण दिले आहे. |
| ५ | **महामार्ग हेल्पलाईन** | महामार्गावरील/द्रुतगती मार्गावरील अपघात ग्रस्तांना तात्काळ मदत मिळण्यासाठी 'समाधान हेल्पलाईन' चालू आहे. नमुद हेल्पलाईन अंतर्गत मोबाईल क्र. ९५०३२१११००, ९८३३४९८३३४ व ९५०३५१११०० चे फलक सर्व महामार्गावर लावण्यात आले असून, सदर नंबरवर अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीसांकडून जखमींना तात्काळ वैद्यकिय मदत देण्यात येते. |
| ६ | **एक राज्य एक ई-चलान** | वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर डिजीटल चलनाद्वारे कारवाई करण्याकरीता संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये **"एक राज्य एक ई-चलान"** हा प्रकल्प फेब्रुवारी २०१९ पासून सुरु करण्यात आलेला आहे. त्याकरिता संपूर्ण राज्यामध्ये एकूण ७००० ई चलान मशिनचे वाहतूक पोलीस व महामार्ग पोलीसांना वाटप करण्यात आलेले आहे.<br>राज्यातील प्राणांकित अपघातांचे प्रमाणे कमी करण्यासाठी पोलीस दलातर्फे खालील नमूद वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरूध्द जास्तीत जास्त कारवाई करण्यात येते.<br>१) हेल्मेट परिधान न करणारे दुचाकी स्वार, २) सीट बेल्ट न लावता वाहन चालवणारे वाहन चालक व प्रवासी, ३) मोबाईलवर बोलणारे वाहन चालक, ४) विरूद्ध दिशेने वाहन चालविणारे, ५) मद्यप्राशन करून वाहन चालविणारे, ६) महत्तम मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालविणारे, ७) धोकादायकरित्या माल वाहतुक करणारे, ८) रिफ्लेक्टर न लावता वाहन चालविणारे, ९) महामार्गावर व रस्त्यांवर अनधिकृतपणे वाहन थांबविणारे. |
| ७ | **९६ इंटरसेप्टर वाहने** | मा. सर्वोच्च न्यायालय रस्ते सुरक्षा समितीच्या निर्देशानुसार राज्यातील महामार्ग पोलीस विभाग व वाहतूक शाखा यांचेकरिता **९६ इंटर सेप्टर वाहनांची** (स्पीडगन, ब्रेथअॅनालायझर, टिंट मशिन इ. साधनसामुग्रीसह) खरेदी करण्यात आली. सदर वाहने नोव्हेंबर २०१९ पासून राज्यभरात कार्यान्वयीत करण्यात आलेली असून सदर वाहनाद्वारे महत्तम मर्यादेपेक्षा जास्त वेगाने वाहन चालवणाऱ्या चालकांविरुद्ध करवाई करण्यात येते. |
| ८ | **ITMS** | मुंबई - पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतुकीचे नियमन डिजीटलरित्या करण्याकरीता ITMS प्रणाली कार्यान्वयीत करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रणालीमध्ये द्रुतगती मार्गावर सीसीटिव्ही लावण्यात येवून त्याद्वारे कसुरदार वाहन चालक यांचेवर ई चलान द्वारे दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. सदर प्रणालीमुळे कमी मनुष्यबळात वाहतुकीचे नियमन होऊन कसुरदार वाहन चालकांविरूध्द कारवाई करणे शक्य होणार असून, अति वेगाने व बेजबाबदारपणे वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर जरब बसेल व रस्ते अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. |
| ९ | **बिगर शासकीय संस्था.** | मुंबई - पुणे द्रुतगती मार्गावरील व मुंबई - पुणे जूना राष्ट्रीय महामार्गावरील प्राणांतिक अपघात कमीत कमी व्हावेत याकरीता शासनाने दिल्ली येथील NGO 'सेव्ह लाईफ फाऊंडेशन' या संस्थेबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. |

| | | |
|---|---|---|
| १० | **अपघाताचे शास्त्रीय विश्लेषन** | प्राणांतिक व गंभीर अपघातांचे शास्त्रीय विश्लेषन करण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्याअंतर्गत एक अधिकारी व तीन अंमलदार यांचे विशेष पथक निर्माण करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर पथकास परिवहन विभागातील अधिकारी व रस्त्याची देखभाल करणाऱ्या संबंधीत विभागातील अधिकारी यांचेसोबत पोलीस ठाणे अंतर्गत दाखल प्रत्येक प्राणांतिक व गंभीर अपघाताचे घटनास्थळी भेट देवून शास्त्रीय विश्लेषण करून अपघाताचे नेमके कारण शोधण्याबाबत व अपघात घडलेल्या ठिकाणी पुन्हा अपघात होऊ नये यासाठी तातडीच्या, मध्यम/दिर्घ मुदतीच्या उपाययोजना सूचवण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. |
| ११ | **अपघात कमी करण्यास मदत करणारे साधने** | महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी तसेच अपघात होऊ नये यासाठी महामार्गावर आवश्यक ठिकाणी क्रॅश बॅरियरस्, ब्रिफेन वायर, ब्लिंकर्स, पॅराफिट वॉल, रम्बलरस्, रिफ्लेक्टर, कॅट आईज, संरक्षक जाळी, रोड साईनेज व रोड मार्किंग इत्यादी उपाययोजनांबाबत संबंधीत विभागांना कळविण्यात आले आहे. |
| १२ | **अधिसूचना** | राज्यातील द्रुतगती मार्ग/राष्ट्रीय महामार्ग/राज्य महामार्ग/शहरातील रस्ते यांची सरळ रस्त्यांवरील व घाट मार्गातील वाहनांची वेग मर्यादा निश्चित करण्यासाठी या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली असून, संपूर्ण राज्यात दिनांक १८/११/२०१९ पासून लागू करण्यात आलेली आहे.<br>तसेच मुंबई—पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई—कोल्हापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर जड/अवजड वाहनांना उजवीकडील मार्गिकेमधून मार्गक्रमण करण्यास मनाई केल्याबाबतची अधिसूचना या कार्यालयाकडून दिनांक १५/०७/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे,<br>तसेच राज्यातील ज्या महामार्गावर व रस्त्यांवर दोन किंवा त्यापेक्षा अधिक मार्गिका आहेत अशा सर्व महामार्गावर व रस्त्यांवर जड/अवजड वाहनांना उजवीकडील मार्गिकेमधून मार्गक्रमण करण्यास मनाई केल्याबाबतची अधिसूचना दिनांक ०६/०८/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे.<br>सदर अधिसूचनेबाबत जड/अवजड वाहनांचे चालक/मालक व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे चालक यांचेमध्ये सदर अधिसूचनेबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.<br>तसेच **दि. १९/०४/२०२४ रोजी अपोमसं(वा)/४५/नियोजन/१२६८/२०२४ अन्वये मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर वाहनांच्या वेगमर्यादेबाबत सुधारीत अधिसुचना तयार करून राज्यात प्रसिध्द करण्यात आली आहे.** |
| १३ | **पार्कींग अवर्स** | मुंबई—पुणे द्रुतगती महामार्गावर शनिवार, रविवार व सुट्टीचे दिवशी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सप्टेंबर २०१६ पासून **'पार्कींग अवर्स/गोल्डन अवर्स'** योजना राबविण्यात येत असून, सदर योजनेअंतर्गत वाहतूक कोंडीच्या वेळी थ्री एक्सेल, मल्टी एक्सेल, ओडीसी वाहनांची वाहतूक द्रुतगती महामार्गावर काही कालावधीसाठी थांबविण्यात येऊन, फक्त हलकी वाहनांची वाहतूक सुरू ठेवण्यात येते. त्यामुळे मुंबई—पुणे द्रुतगती मार्गावर वाहतुक कोंडी फोडण्यासाठी मदत झाली आहे. |

| अ क्र | मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|
| १. | महामार्ग पोलीस येथे २०२४-२५ मध्ये वाशिम पोलीस घटकातील किती अंमलदार नियुक्ती करण्यात आले व किती भरणे बाकी (रिक्त ) आहे. | महामार्ग पोलीस वाशिम विभागात सन २०२४-२५ या कालावधीत पोलीस अधीक्षक, वाशिम आस्थापनेवरील १३ पो.अंमलदारांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आली होती. त्यापैकी १० पोलीस अंमलदार हजर झालेले असून, उर्वरित ०३ कार्यमुक्त होऊन मसुप विभागात हजर झाल्यानंतर एकही पद रिक्त राहत नाही. |
| २. | अमाणी महामार्ग पोलीस वाशिम येथे कुठल्या सेवाशर्तीच्या आधारे संबधित अंमलदार भरण्यात आले व वगळण्यात आले यांचे पुर्ण तपशिल मह माहिती मिळणेस विनंती. | महामार्ग पोलीस विभागात पोलीस अंमलदार यांची रिक्त पदे प्रतिनियुक्तीवर भरण्याबाबत या कार्यालयाचे दि.०७/०७/२०२२ च्या परिपत्रकान्वये निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. (सोबत प्रत जोडली आहे.) |

अपोमसं (वा)/४३/प्रलि/कर्म.निवड/परिपत्रक/२४ (आ)/२०१७/2333 दिनांक ०७/०७/२०२२.
07 JUL 2022

संदर्भ :- या कार्यालयाचे क्रमांक. अपोमसं (वा.)/ ४३/प्रलि/कर्म. निवड/परिपत्रक/ २४(आ)/ २०१७/३४११, दि.२७/१०/२०२० चे परिपत्रक व क्रमांक ३५४४, दिनांक ०६/११/२०२० व क्रमांक ३६०१, दि. १२/११/२०२० अन्वये निर्गमित करण्यात आलेले शुध्दीपत्रक व क्रमांक २५३, दिनांक २८/०१/२०२१ चे पत्र.

विषय:- महामार्ग पोलीस विभागात प्रतिनियुक्तीवर घेण्यात येणाऱ्या पोलीस अंमलदारांच्या निवड प्रक्रियेबाबत.

परिपत्रक:-

अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाच्या अधिपत्याखालील महामार्ग पोलीस केंद्राकरिता विविध शासन निर्णयान्वये मंजूर असलेली पोलीस अंमलदार यांची रिक्त पदे या कार्यालयाकडून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. <u>महामार्ग पोलीस केंद्रातील पोलीस अंमलदार यांची पदे तातपुरत्या स्वरूपात प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता या कार्यालयाच्या संदर्भाकित पत्रान्वये यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक व शुध्दिपत्रक याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहे.</u>

२. महामार्ग पोलीस विभाग/कार्यालय/केंद्रामध्ये/मदत केंद्र प्रतिनियुक्तीवर पोलीस अंमलदार यांची निवड करण्याकरिता खालील <u>प्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहेत:-</u>

१) वय / किमान सेवा :-
पोलीस शिपाई वय:- ३५ वर्षापर्यंत व कमीत कमी ५ वर्षे सेवा.
पोलीस नाईक वय : - ४० वर्षापर्यंत.
सहायक पोलीस उप निरीक्षक/पोलीस हवालदार :- १५ वर्ष सेवा.
( पोलीस आयुक्त, मुंबई शहर वगळून)

<u>सहायक पोलीस उप निरीक्षक /पोलीस हवालदार /पोलीस शिपाई ही पदे प्रतिनियुक्तीवर भरताना म.पो. केंद्रातील मंजूर संख्याबळानुसार भरण्यात येतील.</u>

२) भाषाज्ञान:-
मराठी व इंग्रजी भोषेचे ज्ञान असावे.

३) वाहन परवाना:-
चारचाकी व दुचाकी वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे. (जीप, सुमो इत्यादी चालविता येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. )

४) स्वच्छ चारित्र्य :-
पोलीस अंमलदार यांच्या विरूध्द कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा दाखल नसावा, कोणतीही विभागीय चौकशी/ प्राथमिक चौकशी, प्रलंबित अथवा प्रताविता नसावी, तसेच यापूर्वी कोणत्याही प्रकरणात निलंबित झालेला नसावा.
सौम्य शिक्षा ०५ पेक्षा जास्त नसाव्यात (म्हणजेच ताकीद किंवा सक्त ताकीद )

५) शारिरीक पात्रता:-
शारिरीक दृष्टया तंदुरूस्त असावा.

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ६) | शेरे:- | मागील १० वर्षाचे वार्षिक शेरे विचारात घेतले जातील. तथापि, अर्ज दिनांकापासून मागील ०५ वर्षामध्ये प्रतिकुल शेरे नसावेत. (उदा. ब -) मागील १० वर्षापैकी काही शेरे लिहीण्यात आले नसतील तर वार्षिक शेर सरासरी 'ब' ग्राहय धरण्यात येतील. |
| ७) | महामार्ग विभागात पुनर्नियुक्ती:- | यापूर्वी महामार्ग पोलीस केंद्रामध्ये कोणत्याही पदावर काम केलेले नसावे. (सफौ/पोहवा/पोशि/चालक पदावर) |
| ८) | संगणक अर्हता:- | संगणकाचे ज्ञान असावे. |
| ९) | घटक प्रमुखांची शिफारस:- | कोणत्याही परिस्थितीत संबधित पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांची शिफारस असल्याशिवाय त्यांचा अर्जाचा विचार होणार नाही. |

३. सदर निवडीबाबत सर्व निकष पूर्ण करणाऱ्या योग्य व पात्र पोलीस अंमलदार यांची महामार्ग पोलीस विभागात प्रतिनियुक्तीवर निवड करण्याचे व निकष बदलण्याचे पुर्ण अधिकारी हे अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे असतील.

४. पोलीस आयुक्त/ अधीक्षक यांच्या आस्थापनेवरून, महामार्ग पोलीस केंद्रातील पोलीस अंमलदार यांची रिक्त पदे भरण्याकरिता या कार्यालयाकडून मागणी प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदांच्या १:३ या प्रमाणात पोलीस अंमलदारांच्या सेवातपशीलाची माहिती कमीत कमी १ महिन्याच्या कालावधीत सोबत जोडलेल्या विवरणपत्रात भरून या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(स्वाक्षरी)

( कुलवंत सारंगल)
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, (सस्नेह सादर.)
मुंबई शहर, नवी मुंबई व नागपूर शहर.

पोलीस अधीक्षक,
पालघर, ठाणे ग्रामीण, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, नंदूरबार, नाशिक ग्रा., धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे ग्रा., सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, लातूर, बीड, जालना, उस्मानाबाद, परभणी, नांदेड, हिंगोली, अकोला, बुलढाणा, वाशिम, अमरावती ग्रा., यवतमाळ, वर्धा, नागपूर ग्रा., भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली.
(पोलीस अंमलदारांचे सेवातपशीलाबाबतचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.)

Scanned with OKEN Scanner

महामार्ग पोलीस विभागात प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्याकरिता पोलीस कर्मचारी यांच्या सेवातपशीलाबाबतचे विवरणपत्र

| अ. क्र. | पोलीस कर्मचाऱ्याचे नाव, हुद्दा व बक्कल क्र. | भरती दिनांक | जन्म दिनांक व वय | सेवानिवृत्ती दिनांक | संगणक ज्ञान आहे किंवा कसे? | वाहन परवाना | बक्षिस | सौम्य शिक्षा | | | गंभिर शिक्षा | विभागीय चौकशी/प्राथमिक चौकशी प्रलंबित/अथवा प्रस्तावित आहे किंवा नाही? तसेच कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल आहे किंवा नाही? | निलंबन | | मागील १० वर्षांचे वार्षिक शेरे | यापूर्वी महामार्ग पोलीस विभागत काम केले आहे किंवा कसे | पोलीस आयुक्त/अधीक्षक यांची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | सक्त ताकिद | द्रव्य दंड | वेतनवाढ स्थगित | | | यापूर्वी निलंबीत | सद्यस्थितीत निलंबीत आहेत किंवा कसे | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner